# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गोवर्धन शिवार, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - 422 222
**Tel. : (0253) – 2230025, 2230111, 2230227**
**Fax : 0253 – 2230470,**
**Web Site-**www.ycmou.ac.in
http://ycmou.digitaluniversity.ac]

# निविदा संच

## उपाहारगृह चालविणे

## Tender Notice No. PUR/2018-19/103

**कुलसचिव,**
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक**

ज्ञानगंगा घरोघरी

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

**Tel. : (0253) – 2230025, 2230111, 2230227**

**Fax : 0253 – 2230470,**

**Web Site-**www.ycmou.ac.in

http://ycmou.digitaluniversity.ac]

## Tender Notice No. PUR/2018-19/103

# निविदा वेळापत्रक

| | |
|---|---|
| **निविदेचे नाव** | **उपाहारगृह चालविणे** |
| **निविदेची किंमत** | **रु. 3000/-(तीन हजार फक्त) ना परतावा**<br>"Finance Officer, YCMOU, Nashik" यांचे नावे देय असलेला धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) तांत्रिक निविदेत सादर करावा. |
| **निविदा इसारा रक्कम** | **रु. 5000/- (पाच हजार फक्त)**<br>"Finance Officer, YCMOU, Nashik" यांचे नावे देय असलेले धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) तांत्रिक निविदेत सादर करावा. |
| **निविदा स्विकारण्याची मुदत** | दि. **11.06.2018 ते 20.06.2018 सकाळी 10.30 ते दुपारी 5.00** पर्यंत कुलसचिव, यचममुवि नाशिक यांचे कार्यालयात निविदा पेटीत टाकाव्यात. |
| **तांत्रिक निविदा उघडण्याची तारीख** | दि. **21.06.2018 रोजी सकाळी 11.00 वाजता** |
| **व्यावसायिक निविदा** | सोबत दिलेल्या प्रक्रियेनुसार तांत्रिक निविदेत पात्र झाल्यानंतर पात्र निविदाधारकांच्याच व्यावसायिक निविदा उघडण्यात येतील. |

**टिप:** सर्व अटी, शर्ती व सूचना निविदेत बघाव्यात. कोणतीही एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

**(डॉ.दिनेश भोंडे)**
**कुलसचिव**

## विद्यापीठाच्या यश इन इमारतीमध्ये उपाहारगृह चालविण्याकरिता निविदा सूचना-

कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथील यश इन इमारतीमध्ये उपाहारगृह चालविण्याकरिता निविदा मागवित आहेत. सदर निविदा विद्यापीठाच्या ycmou.digitaluniversity.ac तसेच ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छूकांनी सदर निविदा संकेतस्थ्ळावरुन डाउनलोड कराव्यात.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे गंगापूर धरणाजवळ महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेले आहे. या विद्यापीठात साधारणतः एकूण 400 व्यक्ती कार्यरत आहेत. याशिवाय विद्यापीठात दररोज अनेक विद्यार्थी परीक्षेच्या व इतर कामासाठी येत असतात. विद्यापीठातर्फे समित्या व कामकाजाकरिता बैठका तसेच सभा घेतल्या जातात. त्यासाठी इतर विभागातून अनेक मान्यवर येत असतात, तसेच या परिसरात बाहेरच्या कार्यक्रमांचे आयोजनही केले जाते.

विद्यापीठाच्या परिसरात उत्कृष्टरित्या बांधलेली यश इन नावाची इमारत आहे. त्याठिकाणी आधुनिक पध्दतीचा भोजन कक्ष आहे. या कक्षामध्ये 18 मोठे टेबल, 66 खूर्च्या , पडदे, एयर कंडीशनर, लाईट, पंखे इ. सोयीने परिपूर्ण व्यवस्था आहे. या कक्षाचे क्षेत्रफळ साधारणतः अंदाजे 6000 स्क्वेअर फूटपेक्षा अधिक आहे. तसेच स्वतंत्र मोठे स्वयंपाकघर व साहित्य ठेवण्याकरिता पुरेशा खोल्या आहेत. सदर कक्ष उपहार गृहासाठी उपलब्ध करुन दिलेला आहे. याठिकाणी 24 तास पाण्याची व विद्युत व्यवस्था उपलब्ध आहे.

सदर उपाहारगृह एक वर्षाकरिता चालविण्यासाठी पात्र कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. सदर उपाहारगृह उत्कृष्टरित्या चालविल्यास म्हणजेच त्याचे काम समाधानकारक वाटल्यास दरवर्षी एक अशा पुढील दोन वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात येऊ शकते. या कंत्राट कालावधीत किंवा त्यानंतरच्या मुदत वाढीत खाद्य पदार्थांच्या ठरलेल्या दरात व अटींमध्ये कोणतेही बदल होणार नाही. जर असे बदल करावयाचे असतील तर स्वतंत्र निविदा काढण्यात येईल.

सदर निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. यामध्ये पहिला लिफाफा हा तांत्रिक निविदेचा असेल व दुसरा लिफाफा हा व्यावसायिक निविदेचा असेल.

**लिफाफा -1 - तांत्रिक निविदा व लिफाफा -2 - व्यावसायिक निविदा हे दोन्ही लिफाफे सिलबंद करुन एका मोठ्या पाकीटात टाकून ते सिलबंद करावे. पाकिटावर मोठ्या अक्षरात “निविदेचे नाव व निविदा क्रमांक” लिहावे. सदर पाकिट दिलेल्या मुदतीत कुलसचिव कार्यालयातील निविदा पेटीत टाकावे.**

### अ) तांत्रिक निविदेमध्ये पात्र होण्याकरिता खालील अटी आहेत.

- तांत्रिक निविदेत (लिफाफा-1) मध्ये रु.3000/- व रु.5000/- रकमेचा डी.डी. असणे आवश्यक आहे.

अ-1) निविदाधारकाजवळ हॉटेल, रेस्टॉरंट, उपाहारगृह, भोजनालय किंवा ज्यात भोजन व स्नॅक्स तयार करुन पुरविल्या जातात अशा उपक्रमाचा कमीतकमी दहा वर्षाचा अनुभव असणे आवश्यक

आहे. यापैकी कमीतकमी पाच वर्षांचा अनुभव विद्यापीठ, महाविद्यालये, वस्तीगृह उपाहारगृह चालविण्याचा असणे आवश्यक आहे. याकरिता आवश्यक असलेले प्रमाणपत्र सोबत जोडावे.

अ-2) निविदाधारकाच्या उपहारगृहाची मागील दोन वर्षांची (2017-18,2016-17)वार्षिक सरासरी उलाढाल रु. 15 लाख असणे आवश्यक आहे. याकरिता मागील दोन वर्षाच्या Income Tax Return किंवा Audited Statements जोडावीत. (उपरोक्त सरासरी म्हणजे दोन वर्षांच्या वार्षिक सरासरींची बेरीज भागिले दोन)

अ-3) निविदा सादर करतांना रु. 5000/- इसारा रकमेचा व रु. 3000/- निविदा किंमतीचा (ना परतावा) बँक धनाकर्ष (डीडी) सोबत जोडावे. सदर डीडी 'Finance Officer, YCMOU, Nashik' या नावाने काढलेले असावेत. इसारा रक्कम पात्र निविदाधारकाने सुरक्षा रक्कम भरल्यानंतर परत करण्यात येईल.

अ-4) निविदाधारकाजवळ Food Safety & Standards Act 2006 अनुसार परवाना असणे आवश्यक आहे. सदर परवान्याची फोटोप्रत जोडावी.

अ-5) निविदाधारकांने जीएसटी नोंदणी व पॅन कार्डची छायांकित प्रत जोडावी.

अ-6) वरीलप्रमाणे तांत्रिक निविदेत पात्र झालेल्या निविदाधारकांना पाच अल्प भोजन (राईस प्लेट) व पाच चहा नियुक्त उपाहारगृह समितीला सादर करावे लागेल. समिती या अनुषंगाने विविध बाबी व जेवणाच्या चवीप्रमाणे गुणांकन करतील. यात कमीतकमी 50% गुण मिळविणे अनिवार्य असेल. त्यापेक्षा कमी गुण मिळालेली निविदा या प्रक्रियेतून बाद होईल. सदर खाद्य पदार्थाची चव भविष्यात अबाधित ठेवणे निविदाधारकास अनिवार्य राहील.

*अ-7)* उपाहारगृह परिक्षण समिती वरील कार्यासाठी निविदाधारकांच्या उपहारगृहांचे दिलेल्या निकषानुसार परीक्षण करुन गुणांकन करेल, एकूण गुण निविड परिच्छेदात दिल्याप्रमाणे काढण्यात येतील.

अ-8) तांत्रिक निविदेत व वरील प्रक्रियेत 50% किंवा जास्त गुण मिळवून पात्र झालेल्या निविदाधारकांचा दुसरा लिफाफा (व्यावसायिक निविदा) उघडला जाईल.

**आ) व्यावसायिक निविदा-**

प्रपत्र 2 मध्ये दिलेल्या तक्त्यामध्ये निविदाधारकांनी दर भरून स्वाक्षरीसह सीलबंद लिफाफ्यात व्यावसायिक निविदा असे नमूद करून सादर करावेत.

वरील आवश्यक अटींव्यतिरिक्त खालील अटीची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

1. विद्यापीठामार्फत डायनिंग हॉल, स्वयंपाक घर , पाणी, लाईट इ. सुविधा निशूल्क दिल्या जातील. या सुविधांच्या रकमेचा विचार करुन कंत्राटदाराने खाद्यपदार्थांचे दर भरणे आवश्यक आहे.
2. कंत्राटदारांच्या कर्मचाऱ्यांना राहण्याकरीता निवास व्यवस्था दिली जाईल, त्याचे वेगळे शुल्क आकारले जाईल.

3. कंत्राटदाराने उपहारगृहामध्ये कार्य करत असलेल्या कर्मचाऱ्यांना स्वच्छ गणवेश देणे आवश्यक आहे. तसेच उपाहारगृहात सेवा देण्यास पुरेसे कर्मचारी उपलब्ध असावेत.
4. उपहारगृहांमध्ये कार्य करित असलेले कर्मचारी आरोग्याच्या दृष्टीने योग्य आहेत याबाबत प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याचा पत्ता व फोटो व आधारकार्ड विद्यापीठाच्या कार्यालयात सादर करावा लागेल. या कर्मचाऱ्यांवर कुठलीही पोलिस केस नसल्याबाबतचे प्रमाणपत्र द्यावे लागेल.
5. कंत्राटदाराने उपहारगृहामधील फर्निचर तसेच विविध उपकरणांची निगा राखणे आवश्यक आहे. तसेच भोजनकक्ष व स्वंयपाकघर स्वच्छ असणे आवश्यक आहे. उपाहारगृहात उंदराचा व इतर प्राण्यांचा प्रादुर्भाव होणार नाही यासाठी आवश्यक ती उपाययोजना **(Paste Control** ) करणे आवश्यक राहील. तसेच माश्या व किड्यांपासून बचाव करण्याकरिता दोन माश्या प्रतिबंध उपकरणे लावणे आवश्यक आहे.
6. कंत्राटदाराला उपहारगृहामध्ये फ्रीज, पाणी शुध्दीकरण यंत्रासह वॉटर कुलरची व्यवस्था करावी लागेल. तसेच करार कालावधीत इलेक्ट्रिक उपकरणांची आणि अन्य वस्तूंची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करावी लागेल.
7. उपाहारगृहात दररोज तयार होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्याची विल्हेवाट विद्यापीठाने नेमून दिलेल्या ठिकाणीच करावी लागेल. कचऱ्याची योग्य रित्या विल्हेवाट न लावल्यास रु **500/-** प्रतिदिन दंड आकारला जाईल.
8. कंत्राटदाराला उपहारगृहामध्ये कार्य करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांबाबत शासकीय नियम व कायदे पाळणे बंधनकारक राहील.
9. उपहारगृहातील कर्मचाऱ्यांचे वेतन व सुरक्षेची सर्व जबाबदारी कामगार कायद्याच्या अद्ययावत तरतूदीनुसार कंत्राटदारांची राहील.
10. नियमित कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त विद्यापीठात घेतल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांना तसेच सभा संमेलनाला येणाऱ्या अभ्यांगतांसाठी विद्यापीठाच्या आवश्यकतेप्रमाणे न्याहारी व भोजनाची व्यवस्था करावी लागेल. शंभरपेक्षा जास्त व्यक्तींचे जेवण एकावेळी द्यावयाचे असल्यास बुफे प्रकारात जेवण देण्याची मुभा राहील.
11. विद्यापीठातील विविध बैठका व इतर उपक्रमाची देयके विद्यापीठामार्फत अदा केले जातील. सदर देयके संगणकावर त्याच दिवशी काढलेली असावीत. मात्र त्यासाठी वापरण्यात येणारे संगणक व प्रिंटरची व्यवस्था कंत्राटदाराने स्व्तः करणे आवश्यक राहील.
12. विद्यापीठाने ठरवून दिलेल्या जागी विद्यापीठ कर्मचारी व अभ्यांगतांना खाद्य पदार्थ पुरवावे लागतील. तसेच अल्पोपहार व भोजनासाठी ठरवून दिलेल्या जागेचा वापर करावा लागेल.
13. उपाहारगृहात सकाळी 7 ते रात्री 9 पर्यंत खाद्यपदार्थ उपलब्ध करुन द्यावे लागतील.
14. स्वंयपाक घरात आगीसारख्या दुर्घटनेपासून बचाव करण्याकरिता विशेष दक्षता घेणे आवश्यक राहील. कंत्राटदाराने गॅस सिलेंडरची अयोग्यरितीने साठवणूक केल्यास रु. 500/- दंड आकारला जाईल.
15. उपाहारगृहात कोणत्याच प्रकारची अमली पदार्थ साठवणूक तसेच त्यांची विक्री करता येणार नाही.

16. खाद्य पदार्थांच्या मान्य केलेल्या दरांचे दरपत्रक प्रत्येक टेबलावर ठेवणे तसेच उपाहारगृहात तक्रारपेटी ठेवणे आवश्यक राहील.
17. कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम विद्यापीठामार्फत दिली जाणार नाही. तसेच विद्यापीठामार्फत दिले जाणारे देयक धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल.
18. सदर कराराच्या अनुषंगाने कायदेविषयक बाबी नाशिक येथील न्यायालयाच्या अखत्यारित येतील.

## इ) सुरक्षा ठेव-

कंत्राट प्राप्त झाल्यानंतर कंत्राटदाराला सुरक्षा ठेव म्हणून रु. 50,000/- (रुपये पन्नास हजार) चा डीडी, (**'Finance Officer, YCMOU, Nashik'** यांच्यानावे काढलेला) विद्यापीठात जमा करावा लागेल. सदर रकमेवर विद्यापीठाकडून कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. त्याचप्रमाणे सदरची रक्कम करार संपल्यानंतर अदा केली जाईल. सदर रक्कम अदा करतांना त्यातून येणे रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम अदा केली जाईल.

## ई) निवड-

कंत्राट देण्याकरिता खालील प्रमाणे श्रेयांक काढला जाईल.

**प्रपत्र 2 पहा**

$$\text{(क) दर श्रेयांक} = \frac{\text{सर्वात कमी बेरीज (स्तंभ ६) असलेल्या निविदाधारकाची एकूण रक्कम}}{\text{स्तंभ ६ मधील या निविदाधारकाची एकूण रक्कम}} \times १००$$

$$\text{(ख)खाद्यपदार्थ तपासणी अहवालामधील (अ – 2)100 पैकी प्राप्त गुण} = \frac{\text{परीक्षणात प्राप्त गुण} \times 100}{\text{परीक्षणात प्राप्त सर्वात जास्त गुण}}$$

**(डॉ.दिनेश भोंडे)**
**कुलसचिव**

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथील यश इन इमारतीत उपाहारगृह चालविण्याकरिता तांत्रिक निविदा.**

| अ. क्र. | विवरण १ | विवरण भरण्यासाठी | |
|---|---|---|---|
| १. | तीन हजार रुपयांचा निविदा अर्ज् शूल्काचा बँक डीमांड ड्राफ्ट् Finance Officer, YCMOU Nashik यांचे नावे काढून तांत्रिक निविदेसोबत जोडावा. | डीडी क्र. व बँक ..................................................... ..................................................... | |
| 2. | उपाहारगृह चालविण्याचा कमीत कमी दहा वर्षाचा अनुभव आवश्यक व यापैकी कमीत कमी पाच वर्षांचा अनुभव विद्यापीठ, महाविद्यालये, वसतिगृहात उपाहारगृह चालविण्याचा असावा. | उपाहारगृह अनुभवाबाबत माहिती वेगळी जोडावी ..................................................... ..................................................... | |
| 3. | मागील २ वर्षाची वार्षिक उलाढाल २०१७-१८ व २०१६-१७ | रु. ..................................... | |
| | | रु. ..................................... | |
| | | एकूण: .................. | सरासरी:.............. |
| 4. | पाच हजार रुपयांचा इसारा रकमेचा बँकेचा डीमांड ड्राफ्ट. Finance Officer, YCMOU Nashik यांचे नावे काढून तांत्रिक निविदेसोबत जोडावा. | डीडी क्र. व बँक ..................................................... ..................................................... | |
| 5. | Food Safety and Standards Act 2006 अनुसार परवाना | क्र.......................... | |
| 6. | जीएसटी Registration व PAN Card | जीएसटी.क्रमांक. ................................................... Pan Card No. ..................................................... | |

**टीप: सोबत उपरोक्त सर्व कागदपत्राच्या प्रती जोडणे अनिवार्य आहे.**

**स्वाक्षरी:**

**निविदाधारकाचे नाव व पत्ता:**

**दिनांक:**

**Stamp of Agency**

**यश इन इमारतीत उपाहारगृह चालविण्याकरिता व्यावसायिक निविदा-**

**निविदाधारकाने खालील तक्त्यात आपले दर नमूद करावेत. (सदर निविदा मान्य झाल्यास या दरात वाढ करता येणार नाही) व्यावसायिक निविदा वेगळ्या पाकिटात सीलबंद सादर करावी. या पाकिटावर लिफाफा -2 व्यावसायिक निविदा असा उल्लेख करावा.**

| क्र. | खाद्यपदार्थाचे नाव व विवरण | प्रती | दर (रुपये) | गुणांक | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६)=(४)x(५) |
| अ | अल्प भोजन (राईस प्लेट) २० सेमी पोळ्या- ३, सुकी भाजी-१, पातळ भाजी-१, भात- १ वाटी, वरण, पापड, लिंबू, कोशिंबीर/ लोणचे, कांदा. | प्रती प्लेट | | २५ | |
| ब | पूर्ण भोजन (अमर्यादित जेवण) पोळी/ पुरी, सुकी भाजी, पातळ भाजी, भात, वरण, पापड, दही/ कढी/ रायता, लिंबू, कोशिंबीर/ लोणचे, कांदा, गोड पदार्थ-१ (बासुंदी, आमरस, फ्रुट सलाड, रसमलई, गुलाबजाम, श्रीखंड ई). | प्रती भोजन | | २५ | |
| क | अत्यल्प भोजन - २० सेमी पोळी ३ किंवा भात, पातळ भाजी-१, लिंबू चटणी/ कांदा | प्रती भोजन | | २५ | |
| ड | न्याहरी ( Snacks) | | | | |
| १ | उपमा/ शिरा/ पोहे | प्रती प्लेट | | | |
| २ | कांदाभजी /बटाटाभजी / मूगभजी | प्रती प्लेट | | | |
| ३ | बटाटेवडा /समोसा, चटणी | प्रती प्लेट | | | |
| ४ | मिसळ व २ पाव | प्रती प्लेट | | | |
| ५ | इडली /वडा, सांभार व चटणी | प्रती प्लेट | | | |
| ६ | ब्रेड-२ नग बटर सह | प्रती प्लेट | | | |
| ७ | साबुदाणा खिचडी /साबुदाणा वडे-२ | प्रती प्लेट | | | |
| | सरासरी= एकूण रक्कम भागिले ७ | | | ५० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| इ | पेय | | | | |
| १ | चहा - १०० मिली | प्रती कप | | | |
| २ | कॉफी- १०० मिली | प्रती कप | | | |
| ३ | दुध- २००मिलि | प्रती ग्लास | | | |
| ४ | लस्सी- २०० मिली | प्रती ग्लास | | | |
| | सरासरी= एकूण रक्कम भागिले ४ | | | १०० | |
| | एकूण बेरीज स्तंभ (६) | | | | |

**दिनांक:** **शिक्का**

**निविदाधारकाची स्वाक्षरी व पत्ता:**

**----------------------------------------कार्यालयीन कामकाजासाठी-----------------------------------**

**क) दर श्रेयांक=** $\frac{\text{सर्वात कमी बेरीज (स्तंभ ६) असलेल्या निविदाधारकाची एकूण रक्कम}}{\text{स्तंभ ६ मधील या निविदाधारकाची एकूण रक्कम}} \times १००$

**ख) खाद्यपदार्थ तपासणी अहवालामधील (अ-२) १०० पैकी प्राप्त गुण =**

**ग) एकूण श्रेयांक= क+ख =**

**सर्वात जास्त श्रेयांक (ग) प्राप्त निविदेला कंत्राट दिल्या जाईल.**

# प्रमाणपत्र

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गोवर्धन नाशिक यांच्या निविदेतील सर्व् अटी व शर्ती मला मान्य् आहेत. उपाहारगृह चालविण्यासाठी निविदेतील प्रपत्र- 2 मध्ये दर नमूद केलेले असून आमचे दर मंजूर झाल्यास उपाहारगृह चालविण्यास आम्ही त्या दरास बांधिल आहोत. आमची निविदा अंतीम झाल्यास प्रपत्र- 2 मध्ये नमूद केलेली रक्कम आम्हास मान्य राहील. विद्यापीठ नियमानुसार उपाहारगृह चालविण्यास आमची कोणतीही हरकत राहणार नाही.

निविदाधारकाची सही ..............................................................................................

नाव ..............................................................................................

पत्ता ..............................................................................................

मोबाईल नंबर ..............................................................................................

शिक्का

**पाकिटावर खालील नमुन्यानुसार माहिती भरून ती संबंधीत पाकिटावर चिकटवावी**

**निविदेचे नाव: उपाहारगृह चालविणे**

**प्रति,**

**मा. कुलसचिव,**

**य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक**

**निविदाधारकाचे नाव, पत्ता:**

____________________________________

____________________________________